## नि.क्र. ५ खालील आदेश

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वाद मिळकत हस्तांतरीत करु नये अथवा त्रयस्त व्यक्तींचे हक्क व हितसंबंध निर्माण करु नये याकरीता तात्पुरता मनाई हुकूम मिळेणकरीता दाखल केला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, वादी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द दावा परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या दावा मिळकतीसंदर्भात वाटणी व ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ हे वादीचे भाऊ असून प्रतिवादी क्र.४ व ५ या वादीच्या बहिणी व प्रतिवादी क्र.३ ही वादी व प्रतिवादींची आई आहे. मौजे आसराची वाडी, ता.रेणापूर जि.लातूर येथील भु.क्र.५१ मधील ३ हेक्टर ९५ आर जमीन, मौजे रायवाउी ता. चाकुर येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.६७४ क्षेत्र ३३ x ३३, ग्रामपंचायत मिळकत क्र, ६७५ क्षेत्र ४० x ३०, ग्रामपंचायत मिळकत क्र.३२३ क्षेत्र ४० x २१ ही मिळकत वादग्रस्त मिळकत आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी संगनमत करुन सदर मिकतीतील वादीस १/६ हिस्सा मिळू नये म्हणून नरसिंग पंढरी मनदुमले यांच्या वयोवृध्दपणाचा गैरफायदा घेवून नि.दि.दा.क्र.११७/२०२० दाखल करुन तडजोड हुकूमनामा घेतला. सदर मिळकत वडीलोपार्जित असून सदर दाव्यात वादीला पक्षकार केलेले नाही. त्यामुळे सदर हुकूमनामा वादीवर बंधनकारक नाही. सदर हुकूमनाम्याआधारे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी फेरफार नोंद करुन घेतली आहे. सदर मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत असल्यामुळे वादीला १/६ हिस्सा मिळणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. वादीने गावातील पंच व नातेवाईक यांच्यासमक्ष वादगस्त मिळकतीची वाटणीची मागणी केली, परंतु प्रतिवादींनी दि.१५.०४.२०२५ रोजी स्पष्ट नकार दिला. तसेच वादग्रस्त मिळकतीतून वादीला बेदखल करण्याची धमकी दिली. तसेच प्रतिवादी हे वादगस्त मिळकतीतून उत्पन्न घेत असून सदर उत्पन्नातील वादीचा १/६ हिस्सा वादीला देत नाहीत. त्यामुळे प्रतिवादींनी वाद मिळकती विक्री

अथवा हस्तांतर करु नये. तसेच दावा मिळकतीत त्रयस्त व्यक्तीचे हितसंबंध प्रस्थापित करु नये. याकरीता वादीने प्रस्तुतचा तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ यांनी हजर होऊन त्यांनी त्यांचा लेखी जबाब नि.क्र. १८ वर दाखल केलेला आहे. तसेच नि.२० येथे पुरसीस दाखल करुन लेखी जबाबदाव्यातील कथने हेच प्रस्तुत अर्जास म्हणणे समजण्यात यावे असे कथन केले आहे. त्यानुसार प्रतिवादींनी वादीची कथने नाकारलेली आहेत. ते पुढे असे कथन करतात की, वादीने सदरचा दावा हा चुकीचा व खोटा दाखल केला असून सत्य परिस्थीती न्यायालयासमोर न आणता प्रतिवादी क्र.२ ते ५ यांना हाताशी धरुन केवळ प्रतिवादी क्र.१ यांना आर्थिक व मानसिक त्रास देण्याच्या हेतून दाखल केला आहे.

०४. प्रतिवादीचे कथन पुढे असे आहे की, मौजे आसराचीवाडी ता. रेणापूर येथील जमीन गट क्र.५१ मधील क्षेत्र ३ हेक्टर ९५ आर जमीन ही एकत्र कुटूंबातील जमीन आहे. परंतु वादीने एकत्र कुटूंबातील जमीन गट क्र.५१ मधील १ हेक्टर ६० आर जमीन प्रतिवादी क्र.४ यांचे पती राजेंद्र चात्रे यांच्याकडून हातउसणे पैसे घेवून वादीच्या वडीलांनी नरसिंग पंढरी मनदुमले यांनी त्यांच्याकडे जमीन गहाण ठेवली. सदर जमीनीवर आजही मुळ मालक प्रतिवादी क्र.१ यांचा ताबा आहे. सदर गहाण ठेवलेली जमीन वादीने दाव्यात सामाविष्ठ केलेली नाही. तसेच राजेंद्र चात्रे यांना दाव्यात पक्षकार केलेले नाही.

०५. प्रतिवादी क्र.१ ते ३ व मयत नरसिंग मनदुमले यांनी मिळून न्यायालयात दावा दाखल केल्याची प्रतिवादी क्र.४ व ५ यांना माहिती दिली होती व त्यांनी त्यास तोंडी संमती दिली होती. प्रतिवादी क्र.१ व २ यांना त्यांचे वडीलांनी कोर्ट डिक्री आधारे दोन्ही मुलांना वाटणीपत्र करुन दिले आहे. त्यावेळी वादीच्या वडीलांनी वादीस व प्रतिवादी क्र.४ व ५ यांना त्याबाबत माहिती दिली होती. त्यावेळी वादी व प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी सांगितले की, आमच्या आई वडीलांचा सांभाळ हा प्रतिवादी क्र.१ नामदेव मनदुमले करत आहे. त्यामुळे आम्हाला कसलीच अडचण नाही. तुम्ही वाटणीपत्र करुन घ्या , तुम्ही आम्हाला चांगल्या घरी लग्न करुन दिले आहे. त्यामुळे आम्हाला तुमच्या

जमीनीतील हक्क नको आहे. म्हणून तिन्ही मुलींनी प्रतिवादी क्र.१ ते ३ व वडील यांच्या हक्कात तोंडी हक्क सोडून दिला आहे. तसेच वादी, प्रतिवादी यांच्या आई वडीलांनी तीन्ही मुलींना त्यांचे चांगल्या घरी लग्न करुन देवून प्रत्येकी पाच लाख रुपये हुंडा व दहा तोळे सोने देवून थाटामाटात करुन दिले होते. तसेच प्रतिवादी क्र.२ यांच्या नावे मौजे बाभळगाव ता.जि.लातूर येथे घर असून तो नोकरीस आहे. सदर घरजागा दावा मिळकतीमध्ये समाविष्ट केलेली नाही. तसेच प्रतिवादी क्र.२ यांची बाभळगाव येथील घराच्या बदल्यात प्रतिवादी क्र.४ चे पती राजेंद्र चात्रे यांच्याकडे गहाण ठेवलेली जमीन प्रतिवादी क्र.१ यांना देण्याचे ठरले होते. प्रतिवादी क्र.४ यांच्या पतीकडून हात उसणे घेतलेले पाच लाख रुपये प्रतिवादी क्र.२ यांनी त्याच्या नोकरीतून व्याजासह सारले ठेवण्याचे वडील नरसिंग मनदुमले यांच्या समक्ष ठरले होते. तसेच वादीचा दावा मुदतीत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०६. प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी हजर होऊन त्यांनी त्यांचा लेखी जबाब व प्रस्तुत अर्जावर म्हणणे नि.क्र. २३ वर दाखल केलेले आहे. प्रतिवादीचे कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंध मान्य केले आहेत. तसेच वादी व प्रतिवादींचे वडील नरसिंग मनदुमले हे दि.२८.१०.२०२० रोजी मयत झाले असून वादी व प्रतिवादी हे त्यांचे वारस आहेत. तसेच दिवाणी न्यायालय क.स्तर चाकूर यांनी दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३४९/२०२४ अन्वये वारसप्रमाणपत्र वादी व प्रतिवादींच्या हक्कात दिलेले आहे. वादी व प्रतिवादी हे एकत्र कुटूंबाचे सदस्य आहेत. प्रस्तुत प्रतिवादींनी दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्याचे मान्य केले आहे. वादीला पक्षकार न करता नि.दि.दा.क्र.११७/२०२० मध्ये हुकूमनामा प्राप्त केला आहे त्यामुळे वादी मागणी करतात त्याप्रमाणे दावा निकाली काढण्यात यावा असे प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी कथन केले आहे.

०७. दोन्ही बाजूंचे कथन व उपलब्ध साक्षीपुरावा लक्षात घेतला असता खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झालेले असून त्या मुद्यांची कारणमिमांसा निष्कर्षासहीत खाली दिल्याप्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीने तिचे प्रकरण सकृतदर्शनी सिध्द केले आहे काय? | होकारार्थी . |
| २) | न्यायाचा समातोल वादीच्या बाजूने असल्याचे वादी सिध्द करतात काय? | होकारार्थी.. |
| ३) | अर्ज नामंजूर केला तर कोणाचे अपरिमित नुकसान होऊ शकते ? | वादीचे. |
| ४) | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

मुद्दे क्र.१ ते ४ बाबत :–

०८. कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुद्दा क्र.१ ते ३ चा एकत्रीत विचार करण्यात येत आहे. वादीची सकृतदर्शनी केस आहे अगर कसे, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे अगर कसे किंवा अर्ज नामंजूर झाल्यास वादीला नुकसान होणार आहे अगर कसे हे पाहण्याकरीता वादीच्या दाव्यातील तुर्तातूर्त अर्जातील कथन व दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन करणे गरजेचे आहे.

०९. वादींनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ नि.४ च्या कागदपत्राच्या यादीसोबत फेरफार क्र.११ ची सत्यप्रत, गट क्र.५१ चा १९९० ते २०००, २००१ ते २०११ या कालावधीतील ७/१२ उतारे, दि.दा.क्र.११७/२०२० मधील हुकूमनाम्याची प्रत, फेरफार क्र.४८५ ची प्रत, गट क्र.५१ चा ८/अ चा उतारा, किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३४९/२०२४ मधील वारसप्रमाणपत्र दिल्याबाबतची आदेशाची प्रत, फेरफार क्र.५८५ प्रत, ग्रामपंचायत मिळकत क्र.६७४ चा ८/अ चा उतारा, ग्रामपंचायत मिळकत क्र.६७५ चा ८/अ चा उतारा, ग्रामपंचायत मिळकत क्र.३२३ चा ८/अ चा उतारा इत्यादी कागदपत्र दाखल केले आहेत.

१०. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्रीत कुटूंबाच्या मिळकती आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकतीतील वादीचा हिस्सा देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी दावा मिळकती हस्तांतरीत केल्यास

अथवा त्रयस्त इसमाचा हक्क प्रस्थापित केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीने दाव्यामध्ये एकत्र कुटूंबाच्या सर्व मिळकती समाविष्ट न केल्यामुळे वादीचा दावा चालण्यास पात्र नाही. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे सर्व मिळकती दाव्यामध्ये सामाविष्ट केल्या आहेत अगर कसे ही बाब पुराव्या अंती विचारात घेणे गरजेचे आहे. प्रतिवादींनी वादीसोबत असलेले नातेसंबंध नाकारलेले नाहीत. त्यामुळे सध्य स्थितीत प्रतिवादींनी दावा मिळकत हस्तांतरीत केली अथवा त्रयस्थ इसमांचा हक्क प्रस्थापित केला तर दाव्यातील गुंतागुंत वाढणार आहे. दाव्यातील दाखल कागदपत्रे व वादी प्रतिवादींचे कथने विचारात घेता अनुकूलतेचा कल हा वादीच्या बाजूने दिसून येतो. प्रतिवादी क्र.१ ने नि.२५ येथे पुरसीस दाखल करुन सदरील दाव्यामधील कोणतीही मिळकत प्रतिवादी क्र.१ विक्री करणार नाही असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी देखील नि.२३ वर म्हणणे दाखल करुन वादीच्या कथनाला पुष्टी दिलेली आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी प्रस्तुत अर्ज नामंजूर केला तर वादीचे अपरिमित नुकसान होऊ शकते. म्हणून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी देऊन मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

## **आ दे श**

१) नि.क्र. ५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकती हस्तांतरीत करु नये अथवा त्रयस्थ व्यक्तीचे हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत, असा तात्पुरता मनाई हुकूम वादीच्या हक्कात देण्यात येतो.

३) अर्जाचा खर्च अंतिम आदेशानुसार.

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.06.09 16:01:38 +0530

(पी.ए.आपटे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
रेणापूर.

दिनांक :– ०९/०६/२०२६.

...